## L. A. BILL No. XXIV OF 2026.

A BILL

FURTHER TO AMEND THE WILD LIFE (PROTECTION) ACT, 1972, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

## सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४.

**वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९७२ चा ५३. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, वन्य जीव (संरक्षण) (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.



(शा.म.मु.) एचबी ३३८७-१ (१०४०-३-२०२६)

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील, अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९७२ चा अधिनियम क्रमांक ५३ याच्या कलम १२ ची सुधारणा.

**२.** वन्य जीव (संरक्षण) अधिनियम,१९७२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम १२ च्या परंतुकामध्ये,- १९७२ चा ५३.

(एक) खंड (क) मधील, "अनुसूची एक मध्ये" या मजकुरानंतर, "अनुसूची एक मधील, भाग कः सस्तन प्राणी यांमधील अनुक्रमांक ४३ येथील नोंदीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बिबट्या पॅन्थेरा पार्डस वगळता," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) खंड (ख) मधील, "अन्य कोणत्याही वन्य प्राण्याच्या" या मजकुरानंतर, "अनुसूची एक मधील, भाग कः सस्तन प्राणी यांमधील अनुक्रमांक ४३ येथील नोंदीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बिबट्या पॅन्थेरा पार्डस, यासह, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ५३) यात, देशाची पारिस्थितिकी व पर्यावरणीय सुरक्षा सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने, वन्य प्राण्यांचे संरक्षण करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद केली आहे. महाराष्ट्र वन्य जीव (संरक्षण) नियम, २०१४ यांसह या अधिनियमात, आणि संबंधित वन अधिनियमांमध्ये व नियमांमध्ये, वन्य जीवांचे सक्षमपणे संवर्धन करण्यासाठी कठोर तरतुदी अंतर्भूत आहेत. संवर्धन व संरक्षणाच्या काटेकोर उपाययोजनांमुळे, राज्यात वन्य प्राण्यांची, विशेषतः, बिबट्यांची संख्या वाढत आहे.

२. राज्यातील अनेक वनक्षेत्रात, बिबट्यांची संख्या ही, त्या क्षेत्राच्या वहन क्षमतेपेक्षा अधिक वाढली आहे. यामुळे, अनेकदा क्षेत्रीय वर्चस्वासाठी त्यांच्यात संघर्ष होतात, त्यामुळे कमकुवत बिबटे त्यांचे प्रदेश सोडून वनांच्या लगतच्या बिगर वनक्षेत्रात विस्थापित होतात.

बिबटे, त्यांच्या अधिवासाच्या गरजा व अन्नाच्या गरजा भागविण्याच्या बाबतीत अत्यंत जुळवून घेणारे व संधिसाधु शिकारी असल्याने, ते शेतांमध्ये, झाडा-झुडूपांमध्ये, व मानवी वस्तीजवळ आढळतात. बिबटयांनी, अशी क्षेत्रे त्यांचा प्रदेश म्हणून स्थापित केलेली आहेत आणि ते अशा बिगर वन क्षेत्रात प्रजनन देखील करतात. मार्जर कुळातील इतर वन्यप्राण्यांच्या पिल्लांच्या तुलनेत बिबटयाच्या बछडयांचा जिवंत राहण्याच्या क्षमतेचा दर अधिक आहे. हे बिबिटे, त्यांच्यासाठी सोपे भक्ष्य असलेल्या पाळीव प्राण्यांकरिता मानवी वस्तीत येतात आणि ते मनुष्यांवरदेखील हल्ला करतात त्यामुळे वारंवार व वाढत जाणारा मानव-वन्य जीव संघर्ष होतो.

३. उक्त अधिनियमाच्या कलम १२ मध्ये अशी तरतूद आहे की, मुख्य वन्य जीव रक्षक, कोणत्याही वन्य प्राण्याचे पर्यायी योग्य अधिवासात स्थानांतरण करणे, वन्य जीवांच्या संख्येचे व्यवस्थापन करणे, इत्यादींचा समावेश असलेल्या शास्त्रीय व्यवस्थापनाच्या प्रयोजनांसाठी, उक्त अधिनियमाच्या अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वन्य प्राण्याच्या बाबतीत, केंद्र सरकारच्या पूर्वपरवानगीने, शिकारीसाठी परवाना (ज्यामध्ये जेरबंद करणे आणि स्थानांतरण करणे याचा समावेश आहे) परवाना देऊ शकेल. उक्त अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची एक मधील नोंद क्रमांक ४३ मध्ये, बिबट्याची नोंद आहे. त्यामुळे, मानव-बिबट्या यांच्यातील संघर्षाच्या प्रकरणांमध्ये, मुख्य वन्य जीव रक्षक, केंद्र सरकारच्या परवानगीखेरीज उक्त कलम १२ अन्वये बिबट्यांच्या संख्येचे व्यवस्थापन किंवा स्थानांतरण करण्यासाठी पावले उचलू शकत नाही. ही अत्यंत विनियमित किचकट प्रक्रिया, वेळखाऊ आहे आणि त्यामुळे बिबट्याच्या प्रभावी शास्त्रीय व्यवस्थापनासाठी व स्थानांतरणासाठी तसेच राज्यातील मानव-बिबट्या यांच्यातील संघर्ष हाताळण्यामध्ये विलंब होत आहे.

म्हणून, राज्य शासनाच्या परवानगीने बिबट्यांचे स्थानांतरण व त्यांची संख्या यांचे व्यवस्थापन यांचा समावेश असलेल्या, शास्त्रीय व्यवस्थापनासाठी मुख्य वन्य जीव रक्षकास आवश्यक ती, पावले उचलणे शक्य व्हावे यासाठी, वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ या च्या कलम १२ मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १६ मार्च, २०२६.

**गणेश नाईक,**
वन मंत्री.

**सन २०२६ चे वि.स.वि. क्र २४— वन्य जीव (संरक्षण) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६.**

**[ वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ यातील उतारे ]**
**( १९७२ चा महा. अधिनियम क्रमांक ५३ )**

**१. ते ११.** *** *** ***

**१२.** या अधिनियमात अन्यत्र काहीही अंतर्भूत असले तरी, मुख्य वन्य जीव रक्षकाने, प्रयोजनांसाठी त्याची कारणे लेखी नमूद करून, आदेशाद्वारे, विहित करण्यात येईल असे शुल्क प्रदान केल्यावर, कोणत्याही व्यक्तीस परवाना देणे कायदेशीर असेल, त्यामुळे असा परवाना मंजूर करणे. परवानाधारक, विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून, पुढील प्रयोजनांसाठी, अशा परवान्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वन्य प्राण्याची शिकार करण्यास हक्कदार असेलः— विशेष प्रयोजनांसाठी परवाना मंजूर करणे.

(क) शिक्षण;

(ख) वैज्ञानिक संशोधन;

(खख) वैज्ञानिक व्यवस्थापन;

**स्पष्टीकरण.—** खंड (खख) च्या प्रयोजनार्थ, "वैज्ञानिक व्यवस्थापन" या शब्द प्रयोगाचा अर्थ,

(एक) कोणत्याही वन्य प्राण्यांचे सुयोग्य अशा पर्यायी अधिवासात स्थानांतरण करणे; किंवा

(दोन) कोणत्याही वन्य प्राण्यांना ठार न मारता किंवा त्यावर विषप्रयोग न करता किंवा ते नष्ट न करता वन्य जीवांच्या संख्येचे व्यवस्थापन करणे, असा आहेः

(ग) (एक) कलम ३८ -झ खालील परवानगीच्या अधीन राहून, मान्यताप्राप्त प्राणिसंग्रहालयांसाठी; किंवा

(दोन) संग्रहालयांसाठी व तत्सम संस्थांसाठी,

नमुने संकलित करणे;

(घ) जीवनरक्षक औषधांच्या निर्मितीसाठी सर्पविष मिळवणे, संकलित करणे किंवा तयार करणे यासाठी,

परंतु,-

(क) केंद्र सरकारच्या पूर्व परवानगीखेरीज अनुसूची एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वन्य प्राण्याच्या बाबतीत; आणि

(ख) राज्य शासनाच्या पूर्व परवानगीखेरीज, अन्य कोणत्याही वन्य प्राण्याच्या बाबतीत;

असा कोणताही परवाना देण्यात येणार नाही.

**१७ क. ते १७ ज.** *** *** ***

**१८. ते ६६.** *** *** ***

**अनुसूची** *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४.]**

**[वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

[**श्री. गणेश नाईक**,
वन मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव -१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.